**नि.फौ.ख.क्र. १८३/२०२५**
**सरकार –वि– योगेश आहिरे**
**निशाणी क्र. २१**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची शपथेवर जबानी.**

नांव – गणेश शिवाजी आहिरे

वय – ३५

धंदा – शेती

राहणार – खडकजांब, ता. चांदवड, जि. नाशिक

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. दि.१७.०९.२०२३ रोजी मी वडाळी भोई पो.चौकीला फिर्याद दिली होती किंवा कसे ते मला आठवत नाही. आरोपींनी मला काठीने मारहाण व दगडाने मारहाण केल्याबाबत मी फिर्याद दिली होती किंवा कसे ते मला आठवत नाही. मला आता मी दिलेली फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकूराविषयी मला काही माहित नाही. त्यावर माझी सही आहे. सहीला **निशाणी २२** देण्यात येते. मला आता पोलिसांनी मला दिलेली मेडीकल यादी दाखवण्यात आली. त्यातील मजकूराविषयी मला काही माहित नाही. त्यावर माझी सही आहे. सहीला **निशाणी २३** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**साक्षीदार सरकारी पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी उलटतपासणीच्या स्वरुपातील सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. ती त्यांना देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे आहे की, आ.क्र. १ हा माझा सख्खा भाऊ आहे व आ.क्र. २ ही माझी सख्खी माझी वहिणी आहे. हे म्हणणे खरे नाही की,

दि.१४.०९.२०२३ रोजी मी दुपारी १२:३० वाजता गट नं. २३५ मधील विहीरीवरील इलेक्ट्रीक मोटार चालू करण्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तेथे आ.क्र. १ आला व ती मोटार चालू करायची नाही असे म्हणून त्याने मला वाईट साईट शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, आ.क्र. १ ने माझी गच्ची धरुन मला काठीने गालावर मारले होते. हे म्हणणे खरे नाही की, आ.क्र. २ ने तिच्या हातातील दगड माझ्या डोक्यात मारला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई सोडवण्यासाठी आली असता तिला देखील आरोपींनी शिवीगाळ व हाताचापटीने मारहाण केली होती तसेच परत मोटार चालू करायला आल्यास तुमचे तंगडे तोडून टाकू अशी धमकी दिली होती.

३. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आम्ही सरकारी दवाखान्यात उपचार घेतले व बरे वाटल्यावर आरोपींविरुद्ध फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादवर मी वाचून सही केली. माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी कोणत्याही कागदावर वाचून सही करतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींसोबतचा माझा वाद मिटलेला असून तशी पुरसीस मी आज न्यायालयात दाखल केलेली आहे. त्यावर मी वाचून सही केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ माझा सख्खा भाऊ असल्यामुळे त्याला वाचवण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्रीमती. एस. एस. पवार यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींसोबत माझा वाद मिटलेला असून

तशी पुरसीस मी न्यायालयात माझ्या सहीने दाखल केलेली आहे. त्यासाठी माझ्यावर कोणताही दबाव नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींविरुद्ध मी केवळ गैरसमजूतीतून फिर्याद दिल्यामुळे मला सदरचे प्रकरण पुढे चालवायचे नाही व सदर प्रकरणात इतर साक्षीदार तपासायचे नाहीत.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.07.17 18:02:12 +0530

**दि. १७.०७.२०२६**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**

**नि.फौ.ख.क्र. १८३/२०२५**
**सरकार –वि– योगेश आहिरे**
**निशाणी क्र. २४**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची शपथेवर जबानी.**

नांव – संज्याबाई शिवाजी आहिरे

वय – ६५

धंदा – शेती

राहणार – खडकजांब, ता. चांदवड, जि. नाशिक

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. दि.१७.०९.२०२३ रोजी माझ्या मुलाने वडाळी भोई पो.चौकीला फिर्याद दिली होती किंवा कसे ते मला आठवत नाही. दि.१८.०९.२०२३ रोजी पोलिसांनी माझा जबाब खडकजांब शिवारात नोंदवला होता किंवा कसे ते मला आठवत नाही. आरोपींनी माझ्या मुलाला काठीने व दगडाने मारहाण केल्याबाबत व मला शिवीगाळ व मारहाण केल्याबाबत माझ्या मुलाने फिर्याद दिली होती व त्याबाबत माझा जबाब घेतला होता किंवा कसे ते मला आठवत नाही.

**सरतपास पूर्ण**

**साक्षीदार सरकारी पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी उलटतपासणीच्या स्वरुपातील सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. ती त्यांना देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे आहे की, आ.क्र. १ हा माझा मुलगा आहे व आ.क्र. २ ही माझी सुन आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.१४.०९.२०२३ रोजी माझा मुलगा योगेश दुपारी १२:३० वाजता गट नं. २३५ मधील विहीरीवरील

इलेक्ट्रीक मोटार चालू करण्यासाठी गेला होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तेथे आ.क्र. १ आला व ती मोटार चालू करायची नाही असे म्हणून त्याने त्याला वाईट साईट शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, आ.क्र. १ ने त्याची गच्ची धरुन त्याला काठीने गालावर मारले होते. हे म्हणणे खरे नाही की, आ.क्र. २ ने तिच्या हातातील दगड माझ्या मुलाच्या डोक्यात मारला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सोडवण्यासाठी आली असता मला देखील आरोपींनी शिवीगाळ व हाताचापटीने मारहाण केली होती तसेच परत मोटार चालू करायला आल्यास तुमचे तंगडे तोडून टाकू अशी धमकी दिली होती.

३. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आम्ही सरकारी दवाखान्यात उपचार घेतले व बरे वाटल्यावर आरोपींविरुद्ध माझ्या मुलाने फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींसोबतचा माझा वाद मिटलेला असून तशी पुरसीस मी आज न्यायालयात दाखल केलेली आहे. त्यावर मी वाचून सही केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ माझा मुलगा असल्यामुळे त्याला वाचवण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्रीमती. एस. एस. पवार यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींसोबत आमचा वाद मिटलेला असून तशी पुरसीस आम्ही न्यायालयात माझ्या सहीने दाखल केलेली आहे. त्यासाठी माझ्यावर कोणताही दबाव नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींविरुद्ध माझ्या मुलाने केवळ गैरसमजूतीतून फिर्याद दिल्यामुळे

आम्हाला सदरचे प्रकरण पुढे चालवायचे नाही व सदर प्रकरणात इतर साक्षीदार तपासायचे नाहीत.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.07.17 18:02:21 +0530

**दि. १७.०७.२०२६** **(वृषाली दी. सुंगारे)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**क.स्तर चांदवड.**